**Publication:** Samana
**Date:** August 26, 2011

# 'स्टेम सेल' थेरपीसाठी जगातील हजारो रुग्ण हिंदुस्थानात

मुंबई, दि. २५ (प्रतिनिधी) - वैद्यकीय उपचारांसाठी दुसऱ्या देशात जाणे याला वैद्यकीय पर्यटन असे म्हटले जाते. सध्या हा जगभरात हजारो कोटींची उलाढाल असलेला उद्योग बनत चालला असून हिंदुस्थानात उपलब्ध झालेल्या 'स्टेम सेल थेरपी' या अत्याधुनिक उपचारामुळे हिंदुस्थातील वैद्यकीय पर्यटनात वाढ होत आहे.

बाळ जन्माला येते तेव्हा त्याच्या नाळेमध्ये असलेल्या रक्तात पेशी निर्मितीची क्षमता असते. नाळेतील रक्तावर प्रक्रिया करून पेशी स्वतंत्र केल्या जातात. याला स्टेम सेल असे म्हणतात. या पेशींचा वापर कर्करोग, मधुमेहासारख्या आजारावर यशस्वी उपचारांसाठी केला जाऊ लागला आहे. हिंदुस्थानची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील हिरानंदानी आणि जसलोक रुग्णालयात स्टेम सेल थेरपीची ऑटोलॉगस कॉन्ड्रोसाइट इम्प्लान्टेशन (एसीआय) उपचारपध्दती अवघ्या ६ हजार रुपयांमध्ये उपलब्ध असल्याने इथे येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत आहे.

हिंदुस्थानात परदेशातून येणारे रुग्ण प्रामुख्याने बोन-मॅरो रोपण, बायपास शस्त्रक्रिया, नेत्र शस्त्रक्रिया, हाडांच्या शस्त्रक्रिया, कॉस्मेटिक्स आणि दातांच्या शस्त्रक्रियांसाठी येतात. त्यातच या स्टेम सेल थेरपीने भर घातल्याने रुग्णांचा उपचारासाठी हिंदुस्थानकडे ओढा वाढला आहे. अस्थिव्यंगोपचारावर ७० हजार डॉलरचा खर्च न परवडल्याने हिंदुस्थानात आलेले दुबईचे ट्रायडेन फर्नांडिस यांनी हिरानंदानी रुग्णालयात एसीआय उपचार करून घेतले. तर नायजेरीयाचे उग्वू रिची चुक्वुडो यांनी उजव्या मांडीच्या गंभीर फ्रॅक्चरवर जसलोकमध्ये एसीआय उपचार घेतले. स्टेम सेल थेरपीमुळे निर्माण होणाऱ्या नव्या पेशी आजारांमुळे कमी झालेली अवयवांची क्षमता नैसर्गिकरित्या पुन्हा पूर्ववत करतात.



## स्वस्त उपचारांमुळे वैद्यकीय पर्यटन वाढले